क्र. प्रशिक्षण/परीक्षा-२/रारापोबल/११८/२०१२/405
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई -४०० ००१
दि. /०२/२०२२
04 FEB 2022

संदर्भ - अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, म.राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक अपोमसं/रारापोबल/१/सशस्त्र पोउपनि परीक्षा/२०२१/२५२७, दि.२/११/२०२१

विषय - राज्य राखीव पोलीस बलातील पोलीस हवालदार / सहायक पोलीस उप निरीक्षक यांची सशस्त्र पोलीस उप निरीक्षक पदावर पदोन्नतीसाठी विभागीय अर्हता परीक्षा-२०२२ आयोजित करणेबाबत.

-----------------

**परिपत्रक :-**

राज्य राखीव पोलीस बलात सशस्त्र पोलीस उप निरीक्षक संवर्गातील भविष्यात रिक्त होणा-या १४२ पदांकरीता विभागीय अर्हता परीक्षा राज्य राखीव पोलीस बलाचे सन १९५९ मध्ये प्रसिध्द झालेल्या नियमावलीतील नियम ५६ ते ६० प्रमाणे सदरची परीक्षा घेण्याचे प्रस्तावित आहे.

१. मुंबई राज्य राखीव पोलीस बल १९५९ मधील नियम ५७ (३) नुसार राज्य राखीव पोलीस बलातील पोलीस हवालदार या पदावर किमान ४ वर्ष सेवा पुर्ण केली असेल, तसेच, सहायक पोलीस उप निरीक्षक या पदावर २ वर्षाची सेवा पुर्ण केली असेल अथवा पोलीस हवालदार व सहायक पोलीस उप निरीक्षक दोन्हीचे मिळून ४ वर्षे सेवा पुर्ण झाली असेल असे पोलीस अंमलदार विभागीय अर्हता परीक्षेस बसण्यास पात्र असतील. विभागीय अर्हता परीक्षेसाठी दिनांक ३१/१/२०२२ रोजी जे उमेदवार वरिल अटी पुर्ण करतील ते सदर परीक्षेसाठी अर्ज करु शकतील.

२. उमेदवाराने परिशिष्ट क मधील आवेदन अर्ज २ प्रतीत भरुन घटक प्रमुखाकडे सादर करावेत. या कार्यालयाकडे उमेदवारांचे परस्पर आवेदन अर्ज स्विकारले जाणार नाहीत. घटक कार्यालयाकडून पाठविण्यात येणारे उमेदवाराचे अर्ज चुकीच्या माहितीमुळे किंवा घटक प्रमुखाने माहिती सांक्षाकीत केली नाही या कारणास्तव अवैध ठरल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी घटक प्रमुखांची राहील. घटक प्रमुख संपुर्ण माहिती तयार करुन सुचना फलकावर लावतील. तसेच सदरची सुचना पोलीस महासंचालक यांचे संकेत स्थळावर प्रसिध्द करतील. सदरची यादी प्रसिध्द झाल्यानंतर उमेदवारांकडून हरकती प्राप्त झाल्यास त्यांचा विचार करुन अंतिम यादी दुसऱ्या दिवशी सुचना फलकावर लावतील, तसेच या कार्यालयास पाठवतील. सदरच्या याद्या त्यांनी संबंधित पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर यांचेकडे पाठवाव्यात.

३. सदर परीक्षेसाठी उपरोक्त सर्व अटी/शर्ती व परीक्षेचे स्वरुप इत्यादी सर्व बाबी घटक प्रमुखांनी संबंधित उमेदवारांच्या निदर्शनास न चुकता आणून द्याव्यात तसेच सदर परीक्षेसाठी विहित केलेल्या आवेदन अर्जाच्या आवश्यक प्रती काढून उमेदवारांना त्यांनी मागणी केल्यास त्या नि:शुल्क उपलब्ध करुन द्याव्यात.

उमेदवारांकडून अर्जाच्या २ प्रती भरुन त्याची एक प्रत त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेखावर ठेऊन, फक्त एकच प्रत संबंधित पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल यांचे कार्यालयास पाठवावी.

४. घटक प्रमुखांनी प्रमाणित केलेले अर्ज संबंधित पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर यांचेकडे स्विकारले जातील. या कार्यालयाकडून अर्जांची तपासणी केली जाणार नाही. परीक्षेपूर्वी अथवा परीक्षेनंतर कोणत्याही टप्प्यावर, उमेदवाराने अर्जात नमूद केलेली माहिती चुकीची वा खोटी असल्याचे अथवा उमेदवार विहित अर्हतेची पूर्तता करीत नसल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांना कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरवण्यात येईल व त्याबाबतचा या कार्यालयाचा निर्णय अंतीम राहील.

५. परीक्षेस बसण्यास इच्छुक असलेल्या सर्व पोलीस कर्मचाऱ्यांचे अर्ज त्यांचे संबंधित घटकप्रमुखांकडे दि.१४/०२/२०२२ पासून स्विकारले जातील व अर्ज स्विकारण्याचा अंतिम दि.२८/०२/२०२२ पर्यत राहील. दि.२८/०२/२०२२ नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. याची कृपया घटक प्रमुखांनी नोंद घ्यावी.

६. परीक्षा केंद्र:- सदर परीक्षेचे परीक्षा केंद्र व केंद्र प्रमुख खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | परिक्षा केंद्र | परीक्षा केंद्र प्रमुख |
|---|---|---|
| १ | पुणे | पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे |
| २. | नागपूर | पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर |

७. घटक प्रमुख उमेदवारांची तपशिलवार माहिती संकलीत करुन MS-EXCEL मध्ये TIMES NEW ROMAN मध्येच या विवरणपत्रामधील नमुन्यात टंकलीखीत करुन प्राप्त झालेल्या अर्जासोबत संबंधित पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल यांचेकडे दि.०७/०३/२०२२ पर्यत न चुकता पाठवावी. व त्याची एक प्रत या कार्यालयास पाठवतील.

८. उमेदवार ज्या रारापोबल गट परिक्षेत्रात येतात त्या परिक्षेत्रातील परीक्षा केंद्रातून बसतील. प्रतिनियुक्तीवर कार्यरत असणाऱ्या उमेदवारांनी त्यांचे अर्ज त्यांचे मुळ घटकामार्फत सादर करावेत. सर्व समादेशक यांनी त्यांचे आस्थापनेवरील इतरत्र प्रतिनियुक्तीवर असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांनाही परीक्षेबाबतची माहिती मिळाल्याची खात्री करावी. जेणेकरुन राज्य राखीव पोलीस बलातील कोणताही पात्र पोलीस अंमलदार परीक्षेस बसण्यापासून वंचित राहणार नाही.

९. उमेदवारांना आसन क्रमांक, प्रवेशपत्र, इ. संबंधित पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल हे दि.१०/३/२०२२ पर्यत देण्याची व्यवस्था करतील. याबाबतीत कोणतीही शंका असल्यास उमेदवार संबंधित पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल यांचेशी संपर्क साधतील. **सदर परीक्षेचा भाग-१ ( लेखी परीक्षा ) दि. १४/०३/२०२२ रोजी घेण्यात येईल.** त्या परीक्षेचा निकाल जाहीर करुन पात्र उमेदवारांची यादी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी जाहीर करण्यात येईल. त्यानंतर दि. २१/०३/२०२२ पासून प्रात्यक्षिक चाचणी सुरु करण्यात येईल.

१०. सदर परीक्षेचा अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे.

**भाग-१ लेखी परीक्षा**

| | |
|---|---|
| १. सामान्य ज्ञान | ५० गुण |
| २. राज्य राखीव पोलीस बल आणि मुंबई, राज्य पोलीस दल यांच्या संघटनेविषयीचे आणि मुंबई राज्य राखीव पोलीस नियम व हिशोबासंबंधी कार्यपध्दती यांचे ज्ञान | |
| एकूण गुण | ५० गुण |

**प्रात्यक्षिक चाचणी**

**भाग-२**

| | | |
|---|---|---|
| १. शिकविण्याची योग्यता | २० गुण | ५० गुण |
| २. समादेश देण्याची योग्यता | ३० गुण | |
| एकूण गुण | | ५० गुण |

**भाग-३**

| | | |
|---|---|---|
| १. शारीरीक शिक्षण | ०५ गुण | २५ गुण |
| २. कंपनी ड्रिल | १० गुण | |
| ३. समारंभ ड्रिल | १० गुण | |
| ४. शस्त्रास्त्रांसंबंधी प्रशिक्षण अ) संगीन | ०५ गुण | ३५ गुण |
| ब) रायफल | १० गुण | |
| क) कार्बाइन व A.K-४७ | ०५ गुण | |
| ड) रिव्हॉल्व्हर | ०५ गुण | |
| इ) ब्रेन गन | १० गुण | |
| ५. युध्द तंत्र आणि दरोडयाविरुध्द उपाययोजना | १५ गुण | ४० गुण |
| ६. रॉयट आणि मॉब ड्रिल | १० गुण | |
| ७. नकाशा वाचन | ०५ गुण | |
| ८. फिल्ड इंजिनियरींग | ०५ गुण | |
| ९. आरोग्य रक्षण व आरोग्यशास्त्र आणि प्रथमोपचार | ०५ गुण | |
| एकूण गुण | | १०० गुण |
| **एकूण गुण ( भाग-१ ते ३ )** | | **२०० गुण** |

११. मुंबई राज्य राखीव पोलीस बल १९५९ मधील नियम ६० मधील टेबल क्रमांक III मध्ये नमूद भाग-१ मधील एकूण २०० गुणांपैकी ५० गुणांची लेखी व मैदानी चाचणी १५० (५०+१०० गुण) गुणांची घेण्यात येईल. सदर लेखी चाचणीत किमान ५०% गुण ( ५० च्या ५०% = २५ गुणांस उत्तीर्ण ) मिळविणारे उमेदवार प्रात्यक्षिक चाचणीसाठी पात्र ठरतील. प्रात्यक्षिक चाचणी भाग-२, ५० गुणांची ( ५० च्या ५०% = २५ गुणांस उत्तीर्ण ) व प्रात्यक्षिक चाचणी भाग-३, १०० गुणांची ( १०० च्या ५०% = ५० गुणांस उत्तीर्ण ) असून प्रात्यक्षिक चाचणीमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक भागामध्ये ५०% गुण मिळविणे आवश्यक आहे. म्हणजेच लेखी व प्रात्यक्षिक चाचणीमध्ये प्रत्येकी ५०% गुण मिळविणे अनिवार्य आहे. प्रत्येक चाचणीमध्ये ५०% गुण प्राप्त

करण्याच्या अर्हतेसोबतच लेखी व प्रात्यक्षिक या दोन्ही चाचण्यांच्या एकूण २०० गुणांपैकी किमान ६०% गुण मिळविणारे उमेदवार उत्तीर्ण घोषित केले जातील (२०० च्या ६०% = १२० ).

१२. भाग-१ ची लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरुपाची असेल.

१३. जिल्हा कवायत निदेशक ( D.D.I) चा पाठयक्रम पुर्ण केलेले पोलीस अंमलदार सदर परीक्षेस बसण्यास पात्र राहील. जिल्हा कवायत निदेशक ( D.D.I) पाठयक्रम परीक्षा केव्हा उत्तीर्ण केली याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्ट - क मधील मुद्दा क्र.१० मध्ये नमूद करावी.

१४. सदरच्या विभागीय अर्हता परीक्षेत पेपरची फेरतपासणी नियमात विहीत नसल्याने फेरतपासणीचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

१५. सदर परीक्षेच्या नियम, अटी, अभ्यासक्रम इ. संदर्भात काही दुरुस्ती किंवा बदल करावयाचे झाल्यास किंवा याबाबत काही शासन आदेश झाल्यास असे बदल करण्याचे अधिकार या कार्यालयाकडे राखून ठेवण्यात येत आहेत. व त्याबाबतचा या कार्यालयाचा निर्णय अंतिम राहील.

१६. सदर परीक्षा ही सशस्त्र पोलीस उप निरीक्षकाच्या १४२ रिक्त पदांकरीता घेण्यात येईल. १४२ रिक्त पदांची गुणवत्ता यादी तयार करुन १०% प्रतिक्षायादी तयार करण्यात येईल.

१७.उपरोक्त परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थीची गुणवत्ता यादी व १०% प्रतिक्षायादी एका वर्षाकरीता किंवा पुढील परीक्षेची घोषणा यापैकी जे आधी असेल तोपर्यंत वैध असेल.

१८. सदर परीक्षा वर्षातून एकदा मार्च महिन्यामध्ये घेण्यात येईल.

१९. सदरचे परिपत्रक पोलीस महासंचालक यांच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर SRPF PSI Recruitment-२०२२ या सदराखाली उपलब्ध करुन देण्यात येईल.

(सही) 4.2.22

**( संजय कुमार )**
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल,

२/- यांनी त्यांचे आस्थापनावरील इतरत्र प्रतिनियुक्तीवर असलेल्या सर्व पोलीस अंमलदारानांही सदरची माहिती मिळाल्याबाबतची खात्री करावी.

प्रत योग्य त्या कार्यवाहीकरीता,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सविनय सादर)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सविनय सादर)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, महामार्ग सुरक्षा पथक / दहशत विरोधी पथक / लोहमार्ग / आर्थिक गुन्हे शाखा / फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, पोलीस बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व पोलीस आयुक्त, ( लोहमार्ग मुंबई सह ).
विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, विसुप्रशा, वडाची वाडी, पुणे
सर्व परिक्षेत्रीय पोलीस उप महानिरीक्षक
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह)
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र
प्राचार्य, राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र, नानविज.
प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.
उप संचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरीता,

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.राज्य, मुंबई
पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर

**परीक्षा केंद्र:-**

# परिशिष्ट - क

## सशस्त्र पोलीस उप निरीक्षक पदाच्या पदोन्नतीसाठीची विभागीय अर्हता परीक्षा उमेदवारांसाठी अर्जाचा नमुना

टिप :- आवेदनपत्र भरण्यापूर्वी घटकप्रमुखांना या कार्यालयाकडून कळविण्यात आलेल्या सूचना उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचाव्यात. अर्जातील माहिती उमेदवाराने स्वत:च्या हस्ताक्षरात दोन प्रतीत काळजीपूर्वक भरावी. एकदा भरण्यात आलेल्या माहितीत बदल करण्यास परवानगी मिळणार नाही.

१. उमेदवाराचे आडनाव :- ----------------------------------------------------------

२. उमेदवाराचे स्वत:चे नाव :- ----------------------------------------------------------

३. उमेदवाराचे वडिलांचे नाव :- ----------------------------------------------------------

४. उमेदवाराचा हुद्दा व बक्कल क्रमांक :- ----------------------------------------------------------

५. कार्यालयाचे नाव व संपूर्ण पत्ता :- ----------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

६. मागासवर्गीय आहे काय? :- होय/नाही. जात :-----------------पोटजात---------------
असल्यास जात/पोटजात नमूद करावी

७. जन्मतारीख :-

| दिवस | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

८. सेवेत दाखल झाल्याचा दि. :-

| दिवस | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

९. सशस्त्र पोलीस हवालदार/सहायक पोलीस उप निरीक्षक या पदावर सलग ४ वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक :-

| दिवस | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

१०.जिल्हा कवायत निदेशक ( D.D.I) ची परीक्षा उत्तीर्ण केल्याचा दिनांक:-

| दिवस | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

११. प्रतिनियुक्तीवर आहात काय? :- होय / नाही.

असल्यास मूळ घटक नमूद करावा ------------------------------------------------------------

दिनांक :-

ठिकाण :-

(उमेदवाराची स्वाक्षरी )

सूचना :- अर्जातील सर्व बाबींची माहिती उमेदवाराने भरणे आवश्यक आहे. उमेदवाराचे संबंधात एखादी बाब लागू नसल्यास त्या रकान्यासमोर " निरंक " असे नमूद करावे. मात्र कोरी जागा सोडू नये. अपूर्ण भरलेल्या अर्जाचा परिक्षेसाठी विचार केला जाणार नाही. त्याचप्रमाणे उमेदवाराने अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळल्यास त्याचे विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

---

प्रमाणित करण्यात येत आहे की, बक्कल क्रमांक ----------------------------------श्री.-----------------------
-----------------------------------------------------------------------------------------यांनी अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती त्यांचे सेवा अभिलेखावरुन पडताळण्यात आली असून ती सेवा अभिलेखाप्रमाणे बरोबर व खरी आहे. त्याचप्रमाणे अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई यांनी त्यांचे दि. ०४/०२/२०२२ च्या परिपत्रकान्वये कळविलेल्या सर्व सूचना सदर उमेदवाराचे निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत. त्यांना माहे, मार्च - २०२२ मध्ये घेण्यात येणा-या विभागीय परिक्षेस बसण्यास परवानगी मिळावी म्हणून शिफारस करण्यात येत आहे.

कार्यालयाचा शिक्का :-

दिनांक :-

ठिकाण :-

घटक प्रमुखाची सही
(नाव)
(हुद्दा)

टिप: या प्रमाणपत्रावर पोलीस अधीक्षक दर्जापेक्षा कमी दर्जाच्या अधिका-याची स्वाक्षरी ग्राहय धरली जाणार नाही. तसेच त्या अधिका-याकरिता केलेली स्वाक्षरीही ग्राहय धरली जाणार नाही.